# स्व. विमल पत्तरकिने सुगम संगीत स्पर्धा

दिनांक २४ सप्टेंबर २०२२

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर येथे दिनांक २४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता स्व. विमल पत्तरकिने सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कलावंत श्रीयुत गुणवंत घटवाई होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्ज्वल लांजेवार यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेमागची भूमिका व पार्श्वभूमी विशद केली. कार्यक्रमाला परीक्षक म्हणून डॉ. अंजु शरण व कु. निर्मिती देवळसी लाभल्या. कु. श्रेया सालोडकर हिने कार्यक्रमाचे अध्यक्ष व परीक्षकांचा परिचय करून दिला. संगीत विभागप्रमुख डॉ. सुनिता शिंझर्डे यांनी प्रथमच कराओके ट्रॅकवर घेण्यात येत असलेल्या अभिनव स्पर्धेची ओळख करून दिली. स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण 14 स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्वरा संगीत अकादमी व संगीत विभागातील विद्यार्थिनींनी प्रार्थना गीत सादर केले. संगीत हे आत्मसंवादाचे प्रभावी माध्यम आहे, प्रत्येकाने स्वानंदानुभूतीकरिता शास्त्रशुद्ध संगीताच्या मुळाशी जाऊन अभ्यास करावा, सखोल ज्ञान प्राप्त करावे, असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गुणवंत घटवाई यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व नंदकिशोर पत्तरकिने यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. वैष्णवी कुंभलवार हिने पटकावला.

वैजयंती व रोख रक्कम असे पारितोषिक प्रथम क्रमांकाला देण्यात आले. द्वितीय क्रमांक कु. श्रेया साळोखकर व तृतीय उत्तेजनार्थ पारितोषिक कु. रसिका पुजारी हि यांनी पटकाविला. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमाला पत्रकिने कुटुंबियांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुचिता मराठे, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे, प्राध्यापक वृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रसिका देशपांडे हिने केले तर आभारप्रदर्शन कु. जयंती जोशी ने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनिता शिंदे, प्रा दीपश्री पाटील, प्रा वैशाली उपाध्ये, प्रा. रूपा व्यास यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Rupa Vyas
V.V.M.
प्रभारी प्राध्यापक